**ठळक बातम्या**

- संसदेत आज दिवसभर सुरळीत कामकाज, तंबाखूजन्य पदार्थांवर अतिरिक्त उत्पादन शुल्क लादणारं विधेयक लोकसभेत मंजूर

- पान मसाल्याच्या प्रत्येक पाकिटावर किंमत छापणं बंधनकारक

- छत्तीसगडमधे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार, ३ जवान शहीद

- डॉलरच्या तुलनेत विनियम दरात रुपया ९० रुपयांच्या निचांकी पातळीवर

**आणि**

- दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५९ धावांचं आव्हान, विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाडचं शतक

**<><><><><>**

लोकसभा आणि राज्यसभेत आज दिवसभर सुरळीत कामकाज झालं. प्रश्नोत्तराचा तास, विविध विधेयकं यावर दोन्ही सभागृहात चर्चा झाली. राज्यसभेत आज दिवसभरासाठी नेमून दिलेलं कामकाज पूर्ण झालं. लोकसभेत तर उत्पादन शुल्क विधेयकावरच्या चर्चेसाठी कामकाजाची वेळ वाढवण्यात आली होती.

**<><><><><>**

तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांवर अतिरिक्त उत्पादन शुल्क लादण्याची तरतूद असलेलं विधेयक लोकसभेनं आज आवाजी मतदानानं मंजूर केलं. जीएसटीतला अधिभार रद्द झाल्यावर हे शुल्क लागू होणार आहे. तंबाखू, सिगारेट, सिगार, हुक्का, जर्दा, सुगंधी तंबाखू यासारख्या गोष्टींवर हे अतिरिक्त उत्पादन शुल्क लागू होईल. सध्या या वस्तूंवर २८ टक्के जीएसटी लागू होतो. या विधेयकातल्या तरतुदीमुळे सिगारेटवर पावणे ३ ते ११ रुपयांचं आणि तंबाखूवर किलोमागं १०० रुपयांचं उत्पादन शुल्क लागण्याची शक्यता आहे.

जीएसटी अधिभार कमी झाल्यानं कमी होऊ शकणाऱ्या किंमती, या अधिभारामुळं कायम राहतील अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. नागरिकांनी

या वस्तूंचा उपयोग कमी करावा यासाठी हे शुल्क लादलं जात असल्याचं या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना त्या म्हणाल्या.

<><><><><>

पान मसाल्याच्या प्रत्येक लहान मोठ्या पाकिटावर किरकोळ विक्री किंमत लिहिणं आणि आवश्यक सूचना देणं केंद्र सरकारनं बंधनकारक केलं आहे. १ फेब्रुवारीपासून हे नियम लागू होतील. यापूर्वी १० ग्रॅम पेक्षा कमी आकाराच्या पाकिटावर किंमत लिहिणं बंधनकारक नव्हतं.

<><><><><>

दिल्लीसह राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी प्रदूषण व्यवस्थापनाच्या वार्षिक कृती आराखड्याच्या अंमलबजावणीला वेग द्यावा, अशा सूचना पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांनी आज केल्या. या प्रदेशातल्या हवेच्या दर्जाचा आढावा घेण्यासाठी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. दिल्लीतल्या प्रदूषण निर्देशांकामुळे सरकार चिंतेत असून याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी अनेक पावलं उचलत आहे, अशी माहिती त्यांनी राज्यसभेत एका चर्चेच्या उत्तरादरम्यान दिली.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संयुक्त रणनीतीवर चर्चा करण्यासाठी आज विरोधी पक्षांच्या नेत्यांनी संसदेत बैठक घेतली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पार्टी, झारखंड मुक्ती मोर्चा, सीपीआयएम, सीपीआय यासह विविध पक्षांचे नेते या बैठकीला उपस्थित होते. मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणासंदर्भात तसंच, संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी या बैठकीत चर्चा झाली.

दरम्यान, नवीन कामगार कायद्यांना विरोध करत विविध पक्षांच्या नेत्यांनी आज संसद भवनाबाहेर निदर्शनं केली. कामगार कायद्यातल्या तरतुदी कामगार हिताच्या विरोधी असून त्या मागे घेण्यात याव्यात, अशी मागणी या नेत्यांनी केली.

<><><><><>

संचार साथी या मोबाईल ॲप वाढता विरोध पाहून सरकारनं मोबाईल उत्पादकांसाठी हे अॅप प्री-इन्स्टॉल करणं अनिवार्य नाही असं स्पष्ट केलं आहे. याविषयी अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड... व्हॉईस कास्ट**

*(संचार साथी या ॲपमुळे खासगी आयुष्यात ढवळाढवळ होण्याचा किंवा नागरिकांवर लक्ष ठेवण्याचा कोणताही धोका निर्माण होत नसल्याचं स्पष्टीकरण सरकारनं दिलं आहे. हे ॲप वापरताना दिलेल्या परवानगी ॲपची नोंदणी करणे, नोंदणीसाठी ओटीपी पाठवणे, मोबाइलच्या IMEI ची तपासणी यासाठी वापरल्या जातील. इतर काहीही उद्देश यामागे नसल्याचा खुलासा सरकारनं केला आहे. उलट, यामुळे फसवणुकीचे प्रकार टाळणं, हरवलेला किंवा चोरीला गेलेला फोन ब्लॉक करणं, आपल्या नावावरची मोबाईल कनेक्शन तपासून अनधिकृत कनेक्शन रिपोर्ट करणं, मोबाईल हँडसेट खरा आहे किंवा नाही, हे तपासणं इत्यादी गोष्टी करणं नागरिकांना सोपं होईल, असं सरकारनं म्हटलं आहे. आतापर्यंत १ कोटी ४० लाख वापरकर्त्यांनी हे ॲप डाऊनलोड केलं आहे. या माध्यमातून २६ लाख चोरीला गेलेले, हरवलेले मोबाइल हँडसेट लक्षात आले आणि त्यापैकी सव्वा ७ लाख मोबाइल सापडले. सुमारे पावणे ५ शे कोटी रुपयांचे गैरव्यवहारही थांबवण्यात यातून यश आलं, अशी माहिती सरकारनं दिली आहे.)*

**<><><><><>**

आत्मनिर्भरतेमुळं राष्ट्रीय सुरक्षेला बळकटी मिळते असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू केलं. केरळमधे तिरुवनंतरपुरम इथं नौदल दिनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. तिरुवनंतरपुरम जवळच्या षण्मुगम समुद्रकिनाऱ्यावर भारतीय नौदलांनी प्रात्यक्षिकं करून आपल्या सामर्थ्याचं दर्शन घडवलं. यात आयएनएस विक्रांत, आयएनएस कोलकाता, आयएनएस इम्फाळसह १९ युद्धनौका आणि ३२ विमानं होती.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्यांच्या मदतीसाठी केंद्र सरकारला २७ नोव्हेंबर रोजी प्रस्ताव पाठवला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारनं प्रस्तावच पाठवला नसल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. संसदेच्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात ही बाब उघड झाल्याचा दावाही विरोधकांकडून केला जात होता. त्यावर ते बोलत होते.

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस***

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपूर इथं सुरू होणार आहे. मुंबईत विधानभवनात आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली, त्यात हा निर्णय झाला. हे अधिवेशन १४ डिसेंबरपर्यंत चालेल. १३ डिसेंबर, शनिवारी आणि १४ डिसेंबर, रविवारी शासकीय सुट्टीच्या दिवशीही सभागृहाचं कामकाज होणार आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे विजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत १२ नक्षलवादी मारले गेले. यात जिल्हा राखीव सुरक्षा रक्षक दलाचे तीन जवान शहीद झाले, तर दोन जवान जखमी झाले. या मोहिमेत दंतेवाडा आणि बिजापूर जिल्ह्यातले केंद्रीय राखीव पोलीस दल, विशेष कृती दल आणि कोब्रा युनिटचे जवानही सहभागी झाले आहेत. दंतेवाडा - बिजापूर सीमेवर हे नक्षलवादी असल्याची खबर मिळाल्यावर या सर्वांनी तिथं संयुक्त शोध मोहीम राबवली होती. या मोहिमेदरम्यान आज सकाळी ही चकमक सुरु झाली. दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार सुरु आहे. आतापर्यंत १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह, तसंच काही रायफल्स आणि स्फोटक साधनसामग्रीही सापडल्याचं पोलिसांनी सांगितलं.

सुरक्षा दलांनी अतिरिक्त मनुष्यबळ त्या ठिकाणी पाठवलं असून शोधमोहीम सुरुच आहे.

**<><><><><>**

डॉलरच्या तुलनेत रुपयानं विनिमय दरात आज पहिल्यांदाच ९० रुपयांची पातळी ओलांडली. दिवसअखेर एक डॉलरचा विनिमय दर २५ पैशांनी घसरुन ९० रुपये २१ पैशांवर या विक्रमी निचांकी पातळीवर स्थिरावला. परदेशी गुंतवणूकदारांनी पैसे काढून घेणं सुरु ठेवल्यानं तसंच कच्च्या तेलाचे दर वाढत असल्यानं डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण सुरू आहे. अमेरिकेसोबत न झालेला व्यापार करार, रिझर्व्ह बँकेनं रुपयाचं अवमूल्यन थांबवण्यासाठी काहीही प्रयत्न केले नसल्यानं सुद्धा ही घसरण सुरू आहे.

रुपयाच्या या घसरणीमुळं सरकार फार चिंतेत नाही. यामुळं महागाईचा दर किंवा निर्यातीवर काही परिणाम होत नसल्याची प्रतिक्रिया मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी आज दिली. पुढच्या वर्षी हे अवमूल्यन कमी होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची आढावा बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. तीन दिवसांच्या या बैठकीनंतर रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा येत्या शुक्रवारी पतधोरण जाहीर करतील.

**<><><><><>**

रायपूर इथं सुरू असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं निर्धारित षटकात ५ गडी गमावून ३५८ धावा केल्या. त्यात विराट कोहली आणि ऋतुराज गायकवाड या शतकवीरांचा मोलाचा वाटा आहे. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १९५ धावांची भागिदारी केली. कोहलीनं १०२, तर ऋतुराजनं १०५ धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या ३१ षटकात ३ बाद १९९ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**